न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२




# महापालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संवाद सत्र संपन्न

## विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि आरोग्यदायी शिक्षणाचे वातावरण निर्माण करण्याचे उद्दिष्ट : विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तक्रार असल्यास सारथी पोर्टलवर नोंदवावी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसोबत चिंचवड येथील ऑटोक्लस्टर येथे संवादसत्राचे आयोजन महापालिकेच्या वतीने करण्यात आले होते. या संवादसत्रात बोलताना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी संबंधित विभागप्रमुख, अधिकारी व मुख्याध्यापकांना विविध सूचना केल्या, त्यावेळी ते बोलत होते.

या संवाद सत्रास सहशहर अभियंता संजय खाबडे, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आरोग्याधिकारी गणेश देशपांडे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, कार्यकारी अभियंता प्रकाश कातोरे तसेच महापालिका शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.



अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील म्हणाले, शाळेची सुरक्षा ही मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. सुरक्षेच्या उपाययोजनांना अधिक बळ देण्यासाठी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. हे सीसीटीव्ही कॅमेरे सुस्थितीत असल्याची खात्री करून घेणे तसेच सुस्थितीत नसल्यास संबंधितांना याबाबत कळविणे हीसुद्धा मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. तसेच मध्यान्ह भोजनाचा दर्जा टिकवून ठेवण्यावर भर देणे गरजेचे आहे. दर महिन्याला भोजनाचा अहवाल तयार करून अन्नाचे वर्गीकरण चांगले किंवा निकृष्ट दर्जाचे असे केले पाहिजे. अन्नाचा दर्जा खराब असल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच शाळा परिसर दिवसातून दोनवेळा आणि शाळेचे स्वच्छतागृह तीनवेळा स्वच्छ करणे बंधनकारक आहे. याबाबत मासिक स्वच्छता अहवाल तयार करून सादर करणे गरजेचे आहे.

### शाळेच्या मागणीनुसार सुरक्षा रक्षक

» प्रत्येक शाळेमध्ये सुमारे २७१ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. हे सुरक्षा रक्षक तीन शिफ्टमध्ये काम करत आहेत तसेच शाळेच्या मागणीनुसार सुरक्षा रक्षक वाढवून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी मेस्को (महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड) च्या सहकार्याने १६ ऑक्टोबर २०२४ रोजी अ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या शाळांपासून टप्प्याटप्प्याने आठही क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये आणखी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार असल्याची माहिती देखील मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे यांनी यावेळी दिली.

### विविध विषयांवर सविस्तर चर्चा

» उपस्थित मुख्याध्यापकांनी आपल्या शंका, समस्या आणि सूचना मांडल्या. तसेच या संवादसत्रात शाळा व विद्यार्थी सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य, शालेय पोषण आहाराचे व्यवस्थापन, प्राथमिक शाळांमध्ये स्थापित केलेल्या वर्गग्रंथालयांचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी उपयुक्त नियोजन, शाळा व्यवस्थापन समितीचा शाळा विकासामध्ये सक्रिय सहभाग, प्राथमिक मुख्यध्यापकांच्या क्लस्टर मिटींग, पर्यवेक्षक शाळा भेटी व संनियंत्रण अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# राहुल गांधी यांचा खरा चेहरा जगासमोर येतोय : शंकर जगताप

## राहुल गांधी यांनी देशातील सामाजिक आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्याबाबत वक्तव्य केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

अमेरिकेच्या चालू दौऱ्यात कॉँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय लोकशाहीवर टीका करून देशातील सामाजिक आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्याबाबत वक्तव्य केले. या घटनेच्या निषेधार्थ पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक भागात पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) भाजपा पदाधिकारी व महिला कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात काळया फिती बांधून आंदोलन केले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.



शंकर जगताप म्हणाले की, राहुल गांधी यांचे वक्तव्य विषारी आहे. ते पंतप्रधान न झाल्यामुळे निराशेतून देशावर टीका करत आहेत."लोकशाहीत अन्यायकारक परिस्थितीवर भाजपच्या निवडणूक विजयांना दोष देऊन मतदारांचा अपमान करणे लज्जास्पद आहे. भारताची प्रतिष्ठा खराब करून, राहुल गांधींनी त्यांचा आत्मविश्वास गमावल्याचे दाखवून दिले आहे, असा आरोप जगताप यांनी केला.

भाजपा संविधान बदलणार, असा प्रचार करणारे स्वतः आज संविधा न बदलण्याचीच भाषा करत असल्याने कॉँग्रेसचा खरा चेहरा देशासमोर आला आहे. कॉँग्रेस जेव्हा निवडणुका हरते तेव्हाच लोकशाही रक्षणाचा कांगावा करतात. राहुल गांधी यांचे खरे रंग आता स्पष्ट झाले आहेत. ते आरक्षण रद्द करण्यासाठी दार उघडत आहेत, अशी टीका जगताप यांनी केली.

"भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी जातीवर आधारित आरक्षणाला विरोध केला. कॉँग्रेस पक्षाने नेहरू यांच्यापासून इंदिरा गांधी आणि राजीव गांधींपर्यंत संसदेत मंडल आयोगाला विरोध केला. समाजावर आधारित आरक्षणाऐवजी 'आर्थिक निकषांवर आरक्षण', असा युक्तिवाद करून दीर्घकाळापासून मंडल आयोगाला विरोध केला. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांवरील अन्यायाचा हा कॉँग्रेसचा इतिहास आहे, याकडे जगताप यांनी लक्ष वेधले.

राहुल गांधी देशात आल्यावर जर जिल्हयात आले तर त्यांना पाय ठेवू देणार नाही, असा इशाराही साबळे यांनी दिला.कॉँग्रेस विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू असताना भाजपा महिला कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या फोटोला जोडे मारत निषेध व्यक्त केला.

# पिंपरी चिंचवड कॉँग्रेसच्या वतीने निषेध आंदोलन

## राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या भाजप नेत्याच्या विरोधात आंदोलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने लोकसभेमधील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या विधानाचा व मांडलेल्या विचाराचा मोडतोड करून विपर्यास करून देशांमध्ये चुकीचा संदेश फेक नरेटीव पसरवण्याचे काम भारतीय जनता पार्टीने सातत्याने करीत आहे.



यावेळी भारतीय जनता पक्षाचा माजी आमदार तरविंदरसिंग मारवा याने जाहीरपणे राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी दिली याबद्दल शहर कॉँग्रेसने पिंपरी चौकात घेतलेल्या आंदोलनामध्ये शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी आपल्या भाषणात आमदार मारवा याचा जाहीर निषेध करून देश विघातक शक्तींनी याआधी महात्मा गांधी, इंदिराजी गांधी, राजीव गांधी यांचे बळी घेतले आहेत. आणि आता भारतीय जनता पार्टीचा आमदार खुलेआम देशातील विरोधी पक्ष नेते यांना जीवे मारण्याची धमकी देतो आणि केंद्र सरकार त्यावर घोषणा देत निषेध आंदोलन केले.

यावेळी श्रीमती श्यामला सोनवणे, बिंदू तिवारी, गौतम अरकडे, भाऊसाहेब मुगुटमल, संदेश नवले, किशोर कळसकर, अमर नाणेकर, चंद्रकांत लोंढे, मयुर जयस्वाल, माऊली मलशेट्टी, विश्वनाथ जगताप, विठ्ठल शिंदे, सोमनाथ शेळके, हिरामण खवळे, जार्ज मॅथ्यू, गौरव चौधरी, मुन्साफ खान, बाबासाहेब बनसोडे, अर्चना राऊत, निर्मला खैरे, अबूबकर लांडगे, सतिश भोसले, वसंत वावरे, रवींद्र कांबळे, चंद्रशेखर जाधव, राहुल शिंपले, योगेश बहिरट, गौतम ओव्हाळ, दीपक भंडारी, विशाल कसबे, कुंदन कसबे, राजन नायर, जमील औटी, सुरज कोथिंबीरे, आवेज सय्यद, सचिन गायकवाड, सचिन नेटके, संदीप शिंदे, अमरजीतसिंह पोथीवाल, फिरोज तांबोळी, संगम गंगापुरे, आकाश शिंदे, ॲड. प्रथमेश कांबळे, ॲड. अनिकेत रसाळ, हरिष डोळस, युवराज दाखले आदींसह इतर शहर कॉँग्रेस मधील पदाधिकारी उपस्थित होते.

# पुणे महापालिकेत दिव्यांग प्रमाणपत्रांची बोगसगिरी

## एका शाखा अभियंत्याकडे एकाच डॉक्टरने दिलेली दोन प्रमाणपत्रे असल्याचे उघडकीस, तक्रारीत सखोल चौकशी करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या मलनिस्सारण आणि देखभाल दुरूस्ती विभागातील शाखा अभियंता आकाश ढेंगे यांचाकडे दोन दिव्यांग प्रमाणपत्र असल्याचे समोर आले आहे. या दिव्यांग प्रमाणपत्राबाबत पुणे महापालिकेकडे लेखी तक्रार आली असून त्यांच्या प्रमाणपत्रांची सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

ढेंगे यांच्याकडे २०१६ मध्ये ६३ टक्के दिव्यांग असल्याचे तर २०१७ मध्ये ५५ टक्के दिव्यांगात्वाचे प्रमाणपत्र आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करुन सरकारी नोकरी मिळवण्याचे प्रकरण पुण्यासह देशभरात चांगलेच गाजले. या प्रकरणानंतर राज्यातील विविध सरकारी खात्यात बोगस प्रमाणपत्रे सादर करुन नोकरी मिळवल्याची प्रकरणे बाहेर येऊ लागले आहेत. पुणे महापालिकेतील सहा अधिकाऱ्यांनी बोगस प्रमाणपत्रे सादर केल्याची तक्रार प्राप्त झाली होती.

राज्यातील प्रत्येक सरकारी खात्यात बोगस प्रमाणपत्र सादर करुन नोकरी मिळविल्याची माहिती विविध संघटनांकडून बाहेर काढली जात आहे.



### जात प्रमाणपत्रही अवैध असल्याचा आरोप?

» ढेंगे यांनी ५ जानेवारी २०१७ रोजी दिव्यांग आरक्षणातून महापालिकेची नोकरी मिळाली होती. कनिष्ठ अभियंता ७५ टक्के सरळसेवा या संवर्गाची बिंदू नामावली नोंदवही पडताळणीसाठी विधानभवनातील मागासवर्ग कक्षाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे जात प्रमाणपत्र सादर करण्यात आले होते. त्यावर कोल्हापूर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जातीचा दावा सिद्ध होत नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे जात प्रमाणपत्र अवैध झाल्याने पुणे महापालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी राज्यसरकारच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव मार्गदर्शनपर आदेश मिळण्याबाबत १३ सप्टेंबर २०२२ रोजी पत्र व्यवहार केला आहे. मात्र त्याबाबत अदयापही कोणतेही आदेश आलेले नाहीत.

त्यानुसार संबंधित विभागांना तक्रारी दाखल केल्या जात आहेत. त्यानुसार प्रहार अपंग क्रांती संस्था पुणे शहर आणि आरपीआय यांनी याबाबत तक्रार केली आहे. आकाश ढेंगे यांनी सादर केलेले दिव्यांग प्रमाणपत्र बोगस असून त्याची सखोल चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. त्यानुसार या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत. या तक्रारीत तथ्य आढळून आल्यास संबंधितांना नोकरीतून बडतर्फ केले जाणार असल्याचे बोलले जात आहे.

ढेंगे यांनी ८ ऑक्टोंबर २०१६ रोजी कनिष्ठ अभियंतापदासाठी परीक्षा दिली होती. त्यावेळी या पदासाठी तीन वर्ष अनुभवाची अट होती. त्यावेळीदेखील त्यांनी सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र बोगस असल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच याप्रकरणी महापालिकेकडे तक्रारदेखील करण्यात आली आहे.

अनुभवाचे बोगस प्रमाणपत्र देवून पालिकेची फसवणूक केल्याची तक्रार महापालिका आयुक्ताकडे करण्यात आली आहे.

### नेमकी काय आहे तक्रार?

» आकाश ढेंगे यांनी दाखल केलेले दिव्यांग प्रमाणपत्र बोगस आहे. ते ५ जानेवारी २०१७ रोजी दिव्यांग मधुन पुणे महापालिकेत कनिष्ठ अभियंतापदावर भरती झालेले आहेत. पुणे महापालिकेत ढेंगे हे प्रत्यक्षात २ फेबुवारी २०१७ रोजी प्रत्यक्ष कामावर रूजू झाले. पालिकेच्या सेवेत रूजू झाल्यापासुन आतापर्यंत केवळ दीड वर्षाचा वाद वगळता ढेंगे हे मलनिस्सारण विभागातच कार्यरत आहेत. ढेंगे यांचाकडे दोन दिव्यांग प्रमाणपत्रे आहेत. ही दोन्ही दिव्यांग प्रमाणपत्रे छत्रपती प्रमिलाराजे (सीपीआर) जिल्हा रुग्णालयातून मिळालेली आहेत. त्यातील पहिले दिव्यांग प्रमाणपत्र २१ डिसेंबर २०१६ रोजीचे असून त्यावर दिव्यांगत्वाचे प्रमाण ६३ टक्के आहे. दुसरे प्रमाणपत्र २० जानेवारी २०१७ रोजीचे असून त्यावर दिव्यांगात्वाचे प्रमाण ५५ टक्के आहे. विशेष म्हणजे, ही दोन्ही प्रमाणपत्रे एकाच डॉक्टरांनी दिलेली आहेत. त्यामुळे ही प्रमाणपत्रे बोगस असल्याचा दावा करण्यात आला आहे.

> चालू शैक्षणिक वर्षामध्ये डीबीटी च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आम्हाला आमच्याविद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेचे साहित्य पुरवता आले आहे. ई-रूपी सारख्या डिजिटल पेमेंट प्रक्रियेमुळे निधीचा कार्यक्षमतेने वापर करण्यात आला असून याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना झाला आहे. चालू वर्षी यशस्वी झालेल्या उपक्रमामुळे भविष्यामध्येही प्रत्येक विद्यार्थ्याला अशा उपक्रमांचा लाभ होणार असून यापुढे यापेक्षा जलद आणि अधिक कार्यक्षम प्रक्रियाराबवू असा आम्हाला विश्वास आहे
>
> - पृथ्वीराज बी.पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.

# मिरवणुकीत लेझर, प्रखर बीम लाईट लावल्यास मंडळांवर होणार कारवाई

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाढ यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये लेझर बीम लाईट, प्रखर बीम लाइटवर बंदी घालण्याचे आदेश सहपोलिस आयुक्तांनी यांनी दिले असताना वाघोली व परिसरातील गावांमध्ये दहीहंडी साजरी करणाऱ्या मंडळांनी लेझर बीम लाईटचा वापर केल्याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी ४ आयोजकांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे गणपती विसर्जन मिरवणुकीत लेझर, प्रखर बीम लाईट लावल्यास कारवाई होणार असल्याने मंडळांनी पोलिसांच्या आदेशाची अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाढ यांनी दिली आहे.

पुणे पोलिसांनी लेझर बीम लाइट वापरण्याबाबत ६० दिवस बंदी घातली आहे. तसे आदेश पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी काढले होते. तसेच कारवाईचा इशारादेखील दिला होता. असे असताना लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दहीहंडीत लेझर, प्रखर बीम लाईटचा वापर केल्याने ४ आयोजकांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



डोळ्यांना त्रास देणाऱ्या या लेझर लाइटमुळे गेल्या वर्षीदेखील पुणेकरांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली होती. तसेच, गणेशोत्सवात यामुळे अनेकांना त्रासदेखील झाला होता. बंदीचे आदेश असताना देखील दहीहंडीत पोलिसांचे आदेश धुडकावून सर्रास लेझर, बीम लाइटचा वापर केल्याचे पाहायला मिळाल्याने पोलिसांनी कारवाई केली आहे. गणपती विसर्जन मिरवणुकीत लेझर, बीम लाइटचा वापर झाल्यास पोलिसांकडून कारवाईचे संकेत मिळत असल्याने मंडळांनी याबाबत काळजी घेणे गरजेचे आहे.

# सहा दिवस रात्री बारापर्यंत स्पिकर

## विसर्जन मिरवणूकीसाठी समन्वय बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवात आजपासून (गुरुवार) विसर्जन मिरवणुकीपर्यंत रात्री बारापर्यंत ध्वनिवर्धक वाजविण्यास परवानगी आहे. गौरी विसर्जन आणि पाच दिवसांच्या गणेशाचे विसर्जन झाल्याने नागरिक सहकुटूंब देखावे पहाण्यास बाहेर पडत आहेत.

यामुळे त्यांना रात्री बारापर्यंत देखाव्यांचा आनंद घेता येणार आहे. त्यानंतर ध्वनिवर्धक बंद असणार आहेत, देखावे मात्र सुरू राहतील, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले.

गणेश विसर्जन मिरवणुकीत विविध विभागांचा समन्वय रहावा तसेच उत्सव विना विघ्न पार पडावा म्हणून अमितेश कुमार यांनी गुरुवारी बैठक घेतली.



यामध्ये सदर निर्णय घेण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, महावितरणचे अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, पीएमआरडीएचे अधिकारी आणि मेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

अपर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील यांनी सांगितले की, उत्सवा संदर्भात पूर्व तयारीच्या बैठका प्रत्येक विभागांनी घेतल्या आहेत. मात्र, एकत्रित समन्वय बैठक झाली नव्हती.

पोलिसांची जबाबदारी कायदा सुव्यवस्था असली तरी बॅरिकेटचे, रस्त्यांचे काम आणि अतिक्रमणची जबाबदारी महापालिकेची असती, विसर्जन मिरवणूकी दरम्यान बॅरिकेट कोठे लावावेत.

कोठून रस्ता खुला ठेवावा तसेच पथारिवाल्यांना कोठे बंदी घालावी ही बाबही कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाची असते. यामुळे सर्व विभागांना एकमेकांशी समन्वय ठेवा यावा या उद्देशाने ही बैठक झाली.

# पूल 32 कोटींचा आणि सुशोभीकरणावर 20 कोटी

## पुलाचे उत्तमरीत्या सुशोभीकरण करण्यासाठी माजी महापौर आणि माजी नगरसेवकांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने सांगवी-बोपोडी असा मुळा नदीवर पूल बांधण्यात येत आहे. पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. आता पुलाच्या सुशोभीकरणावर आणखी २० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार हे सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचा दावा महापालिका अधिकाऱ्यांनी केला आहे.



या पुलासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. हे काम टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड कंपनी करत आहे. कामाची मुदत दोन वर्षे होती. मात्र, पुण्याकडील राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्राची जागा मिळण्यास विलंब झाल्याने ठेकेदाराला ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सप्टेंबर महिन्याचे पंधरा दिवस झाले तरी अद्याप पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे रहदारी सुरू करण्यात आली नाही. असे असताना पुलाच्या सुशोभीकरणासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. केवळ सुशोभीकरणावर १९ कोटी ६३ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहराला जोडणारा हा पूल आहे. त्यामुळे पुलाचे उत्तमरीत्या सुशोभीकरण करण्यासाठी माजी महापौर आणि माजी नगरसेवकांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला आहे. त्यानुसार पुलाचे संकल्पचित्र व प्राथमिक आराखडा बनविण्यात आला. त्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर २५ ऑगस्टला सादरीकरण करण्यात आले. त्यांनी सुचविलेले बदल समाविष्ट करून आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार पुलाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे.

### पुलाकडे जाणारे रस्ते अरुंद

» या नवीन पुलाकडे जाणारे सांगवीतील सर्व रस्ते अरुंद आहेत. पुलाकडे जाण्यासाठी सांगवीतील ममतानगर, दत्त आश्रम मठ, प्रियदर्शनीनगर, पवनानगर, मुळानगर हे रस्ते आहेत. ते सर्व अरुंद आहेत. पुणे शहराकडून ये-जा करणारी वाहतूक रहदारी मोठी असणार आहे. त्यामुळे अंतर्गत अरुंद रस्त्यांवर वाहतूककोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मायक्रोसॉफ्टची हिंजवडीत मोठी गुंतवणूक!

## जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या व्हॅल्यूएबल कंपनीने खरेदी केली जागा : सरकारच्या तिजोरीत आले इतके कोटी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मायक्रोसॉफ्ट इंडियाने हिंजवडीत १६.४ एकर जमीन खरेदी केली आहे. इंडो ग्लोबल इन्फोटेक सिटी कंपनीसोबत मायक्रोसॉफ्टने ५२० कोटी रुपयांना हा व्यवहार केला आहे. याआधी मायक्रोसॉफ्टने डेटा सेंटर उभारणीसाठी दोन वर्षांपूर्वी पिंपरी-चिंचवडमध्ये जमीन खरेदी केली होती. मायक्रोसॉफ्टच्या गुंतवणुकीमुळे रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.




मायक्रोसॉफ्टने हिंजवडी गावाच्या हद्दीत ही जमीन खरेदी केली आहे. हिंजवडी हे राजीव गांधी इन्फोटेक पार्कचा भाग आहे. मायक्रोसॉफ्टने खरेदी केलेली जमीन ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) मालकीची नाही. कंपनीने खासगी जमीन खरेदी केली आहे. अशा जमिनीच्या व्यवहारासाठी एमआयडीसीच्या परवानगीची आवश्यकता नसते. त्यामुळे कंपनीने एमआयडीसीकडे यासाठी परवानगी घेतली नव्हती, अशी माहिती एमआयडीसीतील सूत्रांनी दिली.

मायक्रोसॉफ्टने दोन वर्षांपूर्वी पिंपरी-चिंचवडमध्ये २५ एकर जमीन खरेदी करून तिथे डेटा सेंटरची उभारणी सुरू केली आहे. त्यानंतर कंपनीने आता आणखी जमीन खरेदी केली आहे. आता खरेदी केलेल्या जमिनीचा वापर नेमका कशासाठी करणार हे कंपनीने अद्याप स्पष्ट केलेले नाही. मायक्रोसॉफ्टची देशात हैदराबाद, बंगळुरू आणि नोएडा येथे डेटा सेंटर सध्या कार्यरत असून, तिथे एकूण २३ हजार कर्मचारी काम करीत आहेत. याचबरोबर कंपनीने याच वर्षी हैदराबादमध्ये ४८ एकर जमीन २६७ कोटी रुपयांना डेटा सेंटर उभारणीसाठी खरेदी केली. त्यानंतर आता हिंजवडीत कंपनीने जमीन खरेदी केली आहे.

### कशासाठी खरेदी केली जातेय..

मायक्रोसॉफ्टला भारतात बिझनेस वाढवायचा आहे. खासकरून डेटा ऑपरेशन्स वाढवण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे आणि यासाठी जमीन खरेदी करण्याचा कंपनीचा हेतू यासाठीच आहे. कंपनीने याआधी पुणे, मुंबई आणि चेन्नई येथे डेटा सेंटर तयार केले आहेत. मायक्रोसॉफ्टचे भारतात २३ हजारहून अधिक कर्मचारी आहेत. कंपनीचे बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, मुंबई आणि पुणे येथे कार्यालय आहे. या वर्षाच्या सुरुवातीला कंपनीने भारतात एक मोठे स्किलिंग इनेशिएटिव्ह सुरू केले होते. याद्वारे २० लाख लोकांना २०२५ पर्यंत एआय आणि डिजिटल स्किलचे ट्रेनिंग दिले जाणार आहे.

### हिंजवडीकडे ओढा कायम

» हिंजवडी आयटी पार्कमध्ये माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील अनेक मोठ्या कंपन्या कार्यरत आहेत. त्यात इन्फोसिस, विप्रो, कॉग्निझंटसह इतर अनेक कंपन्यांचा समावेश आहे. गेल्या काही दिवसांपासून हिंजवडी आयटी पार्कमधील अपुऱ्या पायाभूत सुविधांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. याचबरोबर गेल्या १० वर्षांत ३७ कंपन्या आयटी पार्कमधून बाहेर गेल्याचा दावा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मायक्रोसॉफ्टने केलेली गुंतवणूक आयटी पार्कवरील विश्वास वृद्धिंगत करणारी ठरली आहे.

### हिंजवडी आयटी पार्क

» आयटी कंपन्या – २००
» मनुष्यबळ – ३ लाख

# पुणेकरांनो, यंदाचे गणेश विसर्जन होणार दणक्यात!

## ढोल-ताशा हे पुण्याचे हृदय असून, पथकांना त्यांचे वादन करू द्या : सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड

**पुणे | प्रतिनिधी**

ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गणेश विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्या ३० एवढीच मर्यादित ठेवण्याच्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अंतरिम स्थगिती दिली. ढोल-ताशा हे पुण्याचे हृदय असून, पथकांना त्यांचे वादन करू द्या, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. न्यायालयाने या प्रकरणी राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. त्यामुळे 'एनजीटी'च्या आदेशामुळे ढोल-ताशांचा बसलेला 'आव्वाज' पुन्हा वाढण्याची चिन्हे आहेत.



ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गणेश विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्या ३० एवढीच मर्यादित ठेवण्याच्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अंतरिम स्थगिती दिली. ढोल-ताशा हे पुण्याचे हृदय असून, पथकांना त्यांचे वादन करू द्या, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. न्यायालयाने या प्रकरणी राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. त्यामुळे 'एनजीटी'च्या आदेशामुळे ढोल-ताशांचा बसलेला 'आव्वाज' पुन्हा वाढण्याची चिन्हे आहेत.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर दुपारी दोन वाजता या याचिकेवर सुनावणी घेण्यात आली. 'पुण्यात ढोल-ताशा वादनाचे शंभर वर्षांहून अधिक काळापासून मोठे सांस्कृतिक महत्त्व आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली. हा उत्सव जवळ आला असताना, ढोल-ताशा पथकांची कोणतीही बाजू ऐकून न घेता 'एनजीटी'ने हा आदेश दिला असून, ढोल-ताशा-झांज वादन करणाऱ्या पथकांवर त्याचा गंभीर परिणाम होईल,' अशी बाजू ॲड. अमित पै यांनी मांडली. त्यावर, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार व पुणे प्रशासनाला नोटीस काढण्याचा आदेश दिला; तसेच, ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्येवर मर्यादा आणणाऱ्या 'एनजीटी'च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली. या प्रकरणी आता चार ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे.

### 'वाजवायची अन् गाजवायची संधी'

» 'सर्वोच्च न्यायालयाने 'एनजीटी'च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिल्यामुळे ढोल-ताशा पथकांना यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत वाजवायची अन् गाजवायची संधी मिळाली आहे. गणेशोत्सवात ढोल-ताशा वादनाची अनेक वर्षांची परंपरा असताना 'एनजीटी'चा निकाल लागू करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयापुढे आमची बाजू मांडण्याची संधी मिळाली आहे,' असे 'ढोल ताशा महासंघ, महाराष्ट्र'चे अध्यक्ष पराग ठाकूर म्हणाले.


> पुणे पोलिसांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीच एक नियमावली प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार एका पथकात ४० ढोल आणि १० ताशांना परवानगी आहे. त्याची अंमलबजावणी काही वर्षांपासून होत असून, यंदा तीच नियमावली कायम असेल.
> - अमितेश कुमार, पोलिस आयुक्त.

# पुण्यातील सात पोलिस ठाण्यांना लवकरच मुहूर्त

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सूतोवाच : आंबेगाव, नांदेडसिटी, बाणेर, खराडी, वाघोली, फुरसुंगी आणि काळेपडळ

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोलिस आयुक्तालयांतर्गत नव्याने प्रस्तावित असलेल्या सात पोलिस ठाण्यांना अस्तित्वात येण्याच्या दृष्टीने लवकरच मुहूर्त मिळणार आहे. याबाबतचे सूतोवाच खुद्द उपमुख्यमंत्री तसेच पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले आहे. चाकण दौऱ्यादरम्यान पुण्यासह पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाला एकूण ११ पोलिस ठाण्यांना मंजुरी दिल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे पोलिस ठाण्यांच्या स्थापनेला गती मिळण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.



आंबेगाव, नांदेडसिटी, बाणेर, खराडी, वाघोली, फुरसुंगी आणि काळेपडळ ही नवीन सात पोलिस ठाणी प्रस्तावित आहेत. शहरातील भारती विद्यापीठ, सिंहगड रोड, चतुःश्रृंगी, लोणीकाळभोर, लोणीकंद, हडपसर, वानवडी आणि कोंढवा या पोलिस ठाण्यांचे विभाजन करून, तर हवेली आणि हिंजवडी या पोलिस ठाण्यांचा काही भाग समाविष्ट करून या नवीन सात पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात येणार आहे.

राज्य शासनाने ही नवीन सात पोलिस ठाणी सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्याला प्रशासकीय मान्यतादेखील मिळाली आहे. पोलिस ठाण्यासाठी जागा पाहून हद्दीचे नकाशेसुद्धा तयार करण्यात आले आहेत. मात्र मनुष्यबळ आणि आर्थिक निधीची तरतूद झाली नसल्यामुळे या पोलिस ठाण्यांचे कामकाज अद्याप सुरू होऊ शकलेले नाही. विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वी सरकार पुण्याच्या दृष्टिकोनातून काही महत्त्वाचे निर्णय घेऊ शकते. त्यामध्ये या नवीन पोलिस ठाण्यांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

सध्या शहर पोलिस आयुक्तालयांतर्गत ३२ पोलिस ठाणी असून, दररोज शेकडो तक्रारींची प्रकरणे येथे दाखल होत असतात. हा कारभार पाच परिमंडळामध्ये विभागला आहे. शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून, नवी अनेक गावे शहराशी जोडली जात आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणेवरचा ताण वाढतो आहे. शिवाय वाढत्या गुन्हेगारीचा प्रश्न ऐरणीवर आहे. त्याचा विचार करून शहरातील ३२ पोलिस ठाण्यांत आणखी नव्याने सात पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. त्यामुळे शहरात तब्बल ३९ पोलिस ठाणी यापुढे राहतील.

शहरातील काही पोलिस ठाण्यांची हद्द मोठी आहे. तेथे दाखल होणाऱ्या तक्रारींचे प्रमाण इतर पोलिस ठाण्यांच्या तुलनेत चार ते पाच पटीत आहे. पोलिसांना हद्दीत नियंत्रण ठेवताना दमछाक होत आहे. शिवाय उपनगरांचा मोठा भाग या पोलिस ठाण्यांना जोडला गेला आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करून या मोठ्या पोलिस ठाण्यांचे विभाजन करून आणि इतर काही भाग समाविष्ट करून ही सात पोलिस ठाणी निर्माण करण्यात येणार आहेत.

> सात पोलिस ठाणी निर्माण करण्याबाबत आम्ही शासनाला प्रस्ताव दिला होता. त्याबाबत गृहमंत्री आणि वित्तमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सात पोलिस ठाणी सुरू होण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. त्याला या महिन्याअखेर मंजुरी मिळेल अशी आशा आहे. तर विधानसभेच्या आचारसंहितेपूर्वी सात पोलिस ठाण्यांचा विषय मार्गी लागण्याची शक्यता आहे.
> - अमितेश कुमार, पोलिस आयुक्त, पुणे